# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-वि.प./हस्तदेय दि. ८ ऑगस्ट, २०१९

जळगाव दि. ८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी सन २०१२-१३ मध्ये सीजीपीए पॅटर्ननुसार प्रवेशीत ज्या विद्यार्थ्यांचे प्रथम, द्वितीय व तृतीय मिळून एकूण २३ किंवा त्यापेक्षा कमी क्रेडीट बाकी आहेत अशा विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षाला प्रवेश देण्याच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेने केलेल्या शिफारशीला आज गुरुवार दि.८ ऑगस्ट रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या तातडीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. याच बैठकीत विधीशाखा अभ्याक्रमाच्या मे, २०१९ मध्ये झालेल्या एल.एल.बी. आणि बी.ए.एल.एल.बी. परीक्षेत ३५ गुणांची पासिंग व ४० गुणांचा ॲग्रीगेट देण्यासंदर्भातील मानव्य विज्ञान विद्याशाखेची शिफारस मात्र अमान्य करण्यात आली.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी विद्यापरिषदेची तातडीची बैठक झाली. या बैठकीत मानव्य विज्ञान विद्याशाखेने शिफारस केलेल्या ठरावावर सविस्तर चर्चा झाली. विधी शाखा अभ्यासक्रमाच्या एल.एल.बी. (३ वर्ष कोर्स) आणि बी.ए.एल.एल.बी. (५ वर्ष कोर्स) ला मे, २०१९च्या परीक्षेपुरती ३५ गुणांची पासिंग व ४० गुणांचे ॲग्रीगेट देण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली होती. विधी अभ्यासक्रमाचे प्राचार्य बी.वाय. रेड्डी, प्राचार्य डॉ.एन.डी.चौधरी व प्राचार्य डॉ. व्ही.वाय.बहिरम यांनी या शिफारसी मागील भूमिका विशद केली. मे, २०१९ च्या झालेल्या परीक्षेपुरताच हा निर्णय घेतला जावा अशी भूमिका त्यांनी मांडली मात्र अनेक सदस्यांनी पूर्वलक्षी प्रभावाने हा निर्णय घेता येणार नाही यातून गुणवत्तेचे अवमूल्यन होईल अशी भावना व्यक्त केली. मे महिन्यात झालेल्या विद्यापरिषदेच्या सभेत सन २०१९-२० या वर्षा पासून ४० गुणांची पासिंग व ४० गुणांचा ॲग्रीगेट असा निर्णय झाला आहे. त्यामुळे तोच कायम ठेवला जावा असे ही सदस्यांनी मत व्यक्त केले. अखेर सर्व सदस्यांचे मत लक्षात घेऊन विद्याशाखेने केलेली शिफारस अमान्य करण्यात आली. तसेच २०१९-२० या वर्षापासून विधीच्या प्रथम वर्ष प्रवेशीत विद्यार्थ्यांनाच ४० गुणांची पासिंग व ४० गुणांचा ॲग्रीगेट देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

विज्ञान व अभियांत्रिकी विद्याशाखेने अभियांत्रिकी अभ्यासक्रमास सन २०१२-१३ च्या सीजीपीए पॅटर्ननुसार प्रवेशीत ज्या विद्यार्थ्यांचे प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षांचे मिळून २३ किंवा त्यापेक्षा कमी क्रेडीट बाकी आहे त्यांना अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात प्रवेश देण्याची शिफारस करणारा ठराव विद्यापरिषदेच्या आजच्या बैठकीत मांडला होता. या ठरावा मागील भूमिका विशद करतांना प्रा.संजय शेखावत यांनी खान्देशातील १६ अभियांत्रिकी महाविद्यालयांपैकी

८ महाविद्यालये डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ,लोणेरेला संलग्न झाले असून या ८ महाविद्यालयातील अंतिम वर्षाचे विद्यार्थी आपल्या विद्यापीठाशी संलग्न आहेत. अशा अपवादात्मक स्थितीत विद्यापीठ बदल होत असल्यामुळे विद्यार्थीहित लक्षात घेऊन विद्याशाखेने हा निर्णय घेतला आहे असे ते म्हणाले. त्यावर सभागृहात चर्चा झाली व विद्याशाखेची ही शिफारस सर्वसंमतीने मान्य करण्यात आली. हा निर्णय सन २०१२-१३च्या सीजीपीए पॅटर्ननुसार प्रवेशीत विद्यार्थ्यांनाच लागू असणार आहे. नवीन विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. असे ही सभागृहात स्पष्ट करण्यात आले. बैठकीच्या शेवटी कुलसचिव भ.भा.पाटील यांनी आभार मानले.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-वि.ष./हस्तदेय दि. ८ ऑगस्ट, २०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

जनसंपर्क अधिकारी